चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ जुन, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# पत्नीच्या चारीत्र्यावंर संशख घेवुन खुन करून पुरावा नष्ट करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन भारी अंतर्गत पत्नीचा खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आरोपीस १०/०६/२०१९ रोजी **श्री. डि.के. भेंडे सत्र न्यायाधीश क. १ चंद्रपुर यांनी कारावासाची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन भारी अंतर्गत मौजा सोरेकसा येथे दिनांक ०४/११/२०१६ रोजी यातील मृतक महिला आणि तिचा पती व भासरा तसेच कुटुंबातील इतर सदस्य घरात एकत्र राहत असुन रात्रीचे जेवण करून झोपलेले होते. मृतक महिला ही गरोदर असल्याने तिचा पती तिचे चारित्रावर वारंवार संशय घेत होता आणि झगडा भांडण करीत होता. या संशयावरून तिचा पती आरोपी नामे **१)घागरू भिमराव आत्राम वय २१ वर्ष, २) लक्ष्मण भिमराव आत्राम वय २५ वर्ष दोन्ही रा. सोरेकसा ता. जिवती या दोघ्या सख्ख्या भावांनी** मृतक महिलेला झोपेतुन उठवुन तिची निघृण हत्या केली. आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिला जवळील शेतशिवारातील झाडावरील फांदीवर लटकविले होते. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भारी येथे अप.क्र. ३४/२०१६ कलम ३०२, २०१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. सुधिर खिरटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, गडचांदुर, यांनी यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १०/०६/२०१९ रोजी **१)घागरू भिमराव आत्राम वय २१ वर्ष,** यास कलम ३०२, ३४ भादंवि मध्ये आजन्म कारावासाची शिक्षा व ३,०००/—रू दंड, न भरल्यास ०३ महिने कारावास, तसेच कलम २०१ भादंवि मध्ये ०३ वर्ष शिक्षा व १,०००/—रू दंड, न भरल्यास १ महिना शिक्षा, तसेच **आरोपी नामे २) लक्ष्मण भिमराव आत्राम वय २५ वर्ष यास** कलम २०१ भादंवि मध्ये ३ वर्ष शिक्षा व १,०००/—रू दंड, न भरल्यास १ महिना शिक्षा, तसेच ४,०००/—रू नगदी मृतकच्या आईला देण्याचे आदेश देण्यात आले आहे.

**श्री. डि.के. भेंडे सत्र न्यायाधीश क. १ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. सुधाकर देगावार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोशि. शाहरूख खान युनुस खान पठाण पोस्टे भारी यांनी काम पाहिले.

# चोरीचा गुन्हा अवघ्या काही तासातच केला उघड

## चंद्रपुर शहर पोलीसांची विशेष कार्यवाही, मुद्देमालासह दोन आरोपी जेरबंद

दिनांक ११ जुन २०१९ रोजी फिर्यादी नामे नरेश मधुकर खंडारे वय ३२ रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे येवुन रिपोर्ट दिली की, रात्रो दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी त्यांचे राहते घरी ते झोपलेले असतांना खिडकीतुन प्रवेश करून घरातील एक मोबाईल आणि रोख रक्कम चोरून नेली. यावरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. ४७२/२०१९ कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच पोलीसांनी आपली तपास चक्रे फिरवुन माहिती गोळा करणे सुरू केले. नियमित सुरू असलेल्या रात्रो गस्त दरम्यान गुन्हे शोध पथकातील पोलीसांना लक्षात आले की, आपण रात्रो दरम्यान गुन्हेगार चेक करीत असतांना दोन रेकॉर्डवरील गुन्हेगार घरी मिळुन आले नव्हते. पोलीसांचा संशय बळावल्याने काही तासातच पोलीस पथकाने आरोपी नामे १) संदीप मनोहर चौधरी वय २२ रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर यास संशयावरून ताब्यात घेतले आणि त्यांची झडती घेतली असता त्याचे जवळ त्याने चोरी केलेला एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन आणि ५००/—रू मिळुन आले. सदर आरोपीची आणखी कसुन चौकशी केली असता त्यांनी कबुली दिली की, सदरचा गुन्हा हा त्याने आणि त्याचा साथीदार आरोपी नामे २)रवि उर्फ चंक्या रमेश पेंढारकर वय २६ रा. महाकाली वार्ड बागला चौक चंद्रपुर याने केला होता. यावरून आरोपी क्र. २ यास ताब्यात घेण्यात आले. त्याचे कडुन चोरी केलेले १,५००/—रू हस्तगत करण्यात आलेले आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढिल तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर प्रभारी पोनि. श्री. शिवलाल भगत, यांचे नेतृत्वात गुन्हे शोध पथकातील पोहवा. विलास निकोडे, महेंद्र बेसरकर, पोशि सचिन बुटले, प्रमोद डोंगरे यांनी पार पाडली.

---